# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक
दिनांकः- १९/०१/२०१७

पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांचे आस्थापनेवरील सन २०१७ मध्ये रिक्त होणारे पोलीस शिपाई यांची पदे भरण्यासाठी नजिकच्या काळात भरती प्रक्रिया सुरु करावयाची आहे. त्यानुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मध्ये शासनाने खालील प्रमाणे सुधारणा केली आहे. पोलीस भरतीच्या उमेदवारांनी त्याप्रमाणे आपली तयारी करावी.

१) महाराष्ट्र पोलीस शिपाई पदाकरीता शारीरीक चाचणी मधील पुरुष व महिला उमेदवारांसाठी अनुक्रमे ५ किलोमीटर व ३ किलोमीटर धावणे ऐवजी पुरुष उमेदवारांना १६०० मीटर धावणे व महिला उमेदवारांना ८०० मीटर धावणे ही शारीरीक चाचणी दयावी लागणार आहे.

२) महाराष्ट्र पोलीस शिपाई नियमातील तरतुदीत सुधारीत झाल्याने पोलीस शिपाई पदावरील भरतीसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्ष राहील, खुल्या प्रर्वगाकरीता जास्तीत-जास्त २८ वर्ष व मागासवर्गीय प्रर्वगाकरीता जास्तीत-जास्त ३३ वर्ष राहील.

३) महाराष्ट्र पोलीस शिपाई पदाकरीता उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम २(२१) नुसार हलकी वाहने चालविण्याचा परवाना धारण केले असणे आवश्यक आहे. परंतु सदर परवाना धारण न करणाऱ्या उमेदवाराने नियुक्ती नंतर त्यांचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षाच्या आत परवाना धारण करण्यात येईल व त्या कालावधीत हा परवाना धारण न केल्यास निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात येतील, याबाबतचे बंधपत्र सादर केल्यास असा उमेदवार या पदासाठी अर्ज करण्यास पात्र राहील.

४) नक्षलग्रस्त भागासाठी विशेष तरतुद मध्ये शासनाने घोषीत केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहीवासी असलेले अनुसुचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवादयांच्या हल्ल्यात अथवा नक्षलविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार अथवा पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी यांच्या मुलामधील उमेदवारांच्या बाबतीत खालील नमुद केल्याप्रमाणे शारीरीक पात्रता शिथील करण्यात आली आहे.

१) उंची- ४ सेंमी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी (२.५ सेंमी ऐवजी)
२) छाती- छातीच्या मोजमापाची आवश्यकता नाही.

५) महाराष्ट्र पोलीस शिपाई पदाकरीता उमेदवाराने संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे अंतर्भुत करण्यात आले असून नमुद केलेल्या पदावर नियुक्त व्यक्तीने शासनाच्या माहीती व तंत्रज्ञान संचालकाकडून वेळोवळी विहीत करण्यात येणारे संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवाश्यक आहे.